# ‘असहकारी’ संघराज्यप्रणाली

*पंधराव्या वित्त आयोगाच्या संदर्भविषयक अटींवर नियंत्रण आवश्यक आहे, अन्यथा राज्यांच्या वित्तीय अधिकारांवर गदा येईल.*

वित्त आयोग ही घटनात्मक संस्था आहे. केंद्र आणि राज्यं यांच्यातील स्रोतांविषयीचा स्वतंत्र मध्यस्थ म्हणून ही संस्था कार्यरत असते. भारतीय राज्यघटनेतील सातव्या सूचीमध्ये केंद्र व राज्य सरकारांच्या खर्चाविषयीच्या जबाबदाऱ्या नमूद केलेल्या आहेत; या जबाबदाऱ्या त्यांना पार पाडता याव्यात यासाठी केंद्रीय करांचं विभाजन करण्याचं मुख्य काम वित्त आयोग करत असतो. यापूर्वीच्या वित्त आयोगांनी ही भूमिका कौतुकास्पदरित्या पार पाडलेली आहे आणि सर्व घटकांकडून या संस्थेला प्रचंड आदर देण्यात आलेला आहे. स्वतंत्र वित्त आयोग आणि देशाच्या संघराज्यप्रणालीच्या सबलीकरणासाठी या आयोगानं पार पाडलेली भूमिका, हे भारताच्या संघराज्यीय वित्तरचनेचं एक मोठं सामर्थ्य आहे. या आयोगाचं अधिकारक्षेत्र ‘संदर्भविषयक अटीं’मध्ये नमूद केलेलं आहे. पंधराव्या वित्त आयोगाच्या नव्या अटींमुळे राज्यांमध्ये गंभीर धास्तीचं वातावरण निर्माण झालं आहे. या आयोगाने १९७१ सालची लोकसंख्या आधारभूत मानण्याऐवजी २०११मधील लोकसंख्या आधाराला घेतली आहे, त्यामुळं सामायिक महसूल साठ्यातून काही राज्यांना कमी वाटे मिळण्याची शक्यता आहे. या मुद्द्यावरून आधीच वाद झालेला आहे. याशिवाय सदर वित्त आयोगातील संदर्भविषयक अटी मोठ्या प्रमाणात केंद्र सरकारच्या बाजूनं कललेल्या आहेत. पंधराव्या वित्त आयोगाने यासंबंधी समतोल दृष्टिकोन स्वीकारला नाही, तर आधीच उतरंडीच्या रचनेत असलेले केंद्र-राज्यांचे वित्तीय संबंध ‘आदेश व नियंत्रणा’च्या संबंधांमध्ये रूपांतरित होतील. नियोजन आयोग रद्द करण्यात आल्यानंतरचा हा पहिलाच वित्त आयोग आहे, त्यामुळं या आयोगानं केंद्र आणि राज्यांच्या स्रोतांविषयी सर्वांगीण व समतोल दृष्टिकोन राखायची गरज होती. आयोगानं शिफारस केलेल्या मार्गाबाहेरून जाणाऱ्या स्रोतांनाही हे लागू होतं.

स्रोत आणि खर्च यांविषयी एकत्रित दृष्टिकोन पहिल्यांदा चौदाव्या वित्त आयोगानं स्वीकारला होता. राज्यांचा अनियोजित आणि नियोजित महसूली खर्च भागवण्यासाठी ४२ टक्के करांचं हस्तांतरण केंद्राकडून राज्यांकडं व्हावं, अशी शिफारस त्या आयोगानं केली होती. त्याच वेळी २०१५-१६ ते २०१९-२० या वर्षांमधील केंद्रीय वित्तपुरवठ्याचं मूल्यमापन चौदाव्या वित्त आयोगानं केलं होतं, त्यामुळं केंद्रीय यादीत नोंदवलेली कार्यं आणि केंद्रपुरस्कृत योजनांद्वारे प्राधान्यानं केली जाणारी राष्ट्रीय विकासकामं यांकरिता केंद्राकडं पुरेसे वित्तीय स्रोत राहिले. परंतु, चौदाव्या वित्त आयोगानं शिफारस केलेल्या वाढीव कर हस्तांतरणाचं पुनर्मूल्यांकन करण्याचा अभूतपूर्व आदेश पंधराव्या वित्त आयोगाला देण्यात आला आहे. सदर कर हस्तांतरणामुळं केंद्र सरकारच्या वित्तीय अवस्थेला आणि ‘न्यू इंडिया २०२२’ यांसारख्या राष्ट्रीय विकास कार्यक्रमांना कोणत्या

अपरिहार्यतांना सामोरं जावं लागेल, याचा तपास करण्यासाठी हे आदेश देण्यात आलेले आहेत. हा 'न्यू इंडिया-२०२२' कार्यक्रम म्हणजे नक्की आहे काय? २०१९ साली कार्यकाळ समाप्त होत असलेलं सरकार दुसऱ्या कुणी तरी आपल्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी यासाठी २०२२ सालापर्यंत केंद्रीय स्रोत टिकवून ठेवण्याची सूचना वित्त आयोगाला करू शकतं का? या 'नवभारता'च्या कार्यक्रमामुळं सामाजिक व आर्थिक क्षेत्रांमध्ये केंद्रपुरस्कृत योजनांचं पेव फुटण्याची शक्यता आहे. शिवाय, संघराज्यीय व्यवस्थेमध्ये केंद्र आणि राज्यांच्या संयुक्त खर्चापैकी सुमारे ५८ टक्के खर्च उचलण्याची जबाबदारी राज्य सरकारांवर असते. अशा वेळी राज्यांचा स्रोत पुरवठा कमी करून राष्ट्रीय विकास कार्यक्रमाची आखणी करता येईल का? सदर संदर्भविषयक अटींचे परिणाम स्पष्ट आणि लख्ख आहेत. व्यापक वित्तीय स्वायत्ततेची प्रक्रिया उलट्या दिशेनं नेण्याची केंद्र सरकारची इच्छा आहे आणि राज्यांचे स्रोत व कार्ये यांवर अधिक नियंत्रण आणण्यासाठी सरकार पावलं उचलतं आहे.

हस्तांतरणानंतर राज्यांना जाणवणारा महसूल तुटवडा भरून काढण्यासाठी अनुच्छेद २७५ अनुसार राज्यांना अनुदान देण्यात आलं आहे. मुळात महसुलातील तुटवडा भरून काढण्यासाठी अनुदान द्यावं किंवा नाही, याचीही तपासणी आयोग करेल, असं आदेशात म्हटलं आहे. आयोगानं ही अनुदानं बंद करण्याचं ठरवलं, तर हस्तांतरणानंतर राज्यांना सहन कराव्या लागणाऱ्या तुटवड्यावर कोणता उपाय केला जाईल? मुळात कर हस्तांतरणानंतर कोणत्याही राज्याला तुटवडाच जाणवणार नाही, अशी खातरजमा वित्त आयोगानं करावी, असं या संदर्भ-अटींमधून सुचवण्यात आलेलं आहे. राज्यांच्या महसूल व खर्चविषयक गरजांविषयी अवाजवी अंदाजांचं समर्थन करण्याची सक्ती आयोगावर अप्रत्यक्षरित्या होते आहे.

संदर्भ-अटींमधील अनेक तरतुदींमध्ये त्रुटी आहेत. सातव्या अटीनुसार, विविध प्रदेशांमध्ये सरकारच्या योग्य पातळीवर राज्यांना कामगिरीवर आधारित सवलती देण्याचा प्रस्ताव आयोग मांडू शकतं. या संदर्भात काही प्रश्न उपस्थित होतात. राज्यांच्या कामगिरीचं मूल्यमापन करण्यासाठी आणि त्यांना सवलती देण्यासाठी वित्त आयोग ही योग्य संस्था आहे का? वित्तीय आणि खर्चविषयक अक्षमता दुरुस्त करणं, हे या आयोगाचं मुख्य काम असेल, तर सवलती कुठून द्यायच्या? करवाटपच जर सवलतींवर आधारित होणार असेल, तर वित्तीय समता साध्य करण्याच्या मुख्य भूमिकेतच तडजोड केल्यासारखं होत नाही का? हे सर्व अनुदानांच्या यंत्रणेद्वारे केलं, तर त्यातून कर हस्तांतरणाची व्याप्ती आपोआपच कमी होईल का? आणि त्यातून सशर्त अनुदानांचा वित्तीय अवकाश वाढेल का? केंद्र सरकार न-वित्तीय आयोगांच्याद्वारे सवलती आणि निधी कधीही देऊ शकतं. मग वित्त आयोगाच्या कामकाजावर सातव्या अटीद्वारे मर्यादा का घातली जात आहे?

शेवटी, कर्ज, तुटवडा आणि वित्तीय जबाबदारीचा प्रश्न उपस्थित होतो. एकूणात राज्यं वित्तीयदृष्ट्या विवेकी असतात. सर्व राज्यांचा २०१७-१८ वर्षासाठीचा वित्तीय तुटवडा (अर्थसंकल्पातील अंदाज) सकल घरेलू उत्पन्नाच्या २.७ टक्के आहे. त्यामुळं, पंधराव्या वित्त आयोगानं राज्यांच्या कर्जामध्ये सशर्त कपात केल्यास त्याचे राज्य पातळीवरील खर्चावर परिणाम होतील, विशेषतः विकासकामांवरील खर्चाबाबत हे परिणाम अधिक दिसतील. वित्तीय कामगिरी सुधारण्याची गरज राज्यांना नसून केंद्र सरकारला आहे. 'वित्तीय जबाबदारी आणि अर्थसंकल्प व्यवस्थापन अधिनियमा'त नमूद केलेली लक्ष्यं गाठण्यात केंद्र सरकारनं २००८ सालापासून कुचराई केलेली आहे, हे आपण लक्षात ठेवायला हवं.

●

## दक्षिणेतील वाटचाल

*आंध्र प्रदेशाकडं झालेलं दुर्लक्ष आणि तिथं निर्माण झालेला सत्तासंघर्ष यांतून मोदींच्या भाजपसाठी संकट निर्माण झालं आहे.*

आंध्र प्रदेशात राजकीय सत्तेसाठी सुरू असलेल्या चढाओढीमुळं या राज्यातील भारतीय जनता पक्षाचं (भाजप) स्थान खालावलं आहे आणि नरेंद्र मोदी सरकारचे मातीचे पायही या घटनांमुळं उघडे पडले आहेत. राष्ट्रीय लोकशाही आघाडीमधील (रालोआ) एक सर्वांत जुना आणि मोठा पक्ष असलेल्या तेलुगू देसम पार्टीनं (तेदे) अलीकडंच या सत्ताधारी आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. केंद्रातील आपला भागीदार असलेल्या भाजपकडून आंध्रसाठी विशेष प्रवर्गाचा दर्जा मिळवण्याचा प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर चंद्राबाबू नायडू यांच्या नेतृत्वाखालील तेदेनं रालोआला रामराम ठोकला. विशेष दर्जा मिळवण्यात अपयश आल्यामुळं नायडू सरकारला राज्यात मोठ्या राजकीय आव्हानाला सामोरं जावं लागतं आहे. विरोधी पक्षनेते वाय. एस. जगन मोहन रेड्डी आणि राजकारणात आलेले चित्रपट अभिनेते पवन कल्याण यांनी हे आव्हान उभं केलेलं आहे. यातील पवन कल्याण यांनी २०१४च्या निवडणुकांमध्ये नायडू व भाजप यांना पाठिंबा दिला होता.

नायडूंचे मुख्य प्रतिस्पर्धी असलेल्या जगन रेड्डी यांनी नोव्हेंबर २०१७मध्ये आपले वडील वाय. एस. राजशेखर रेड्डी (वायएसआर) यांच्याप्रमाणे पदयात्रा काढली. यापूर्वी २००४ साली विरोधकांच्या अशा चेतनायात्रांमुळं नायडू यांना सत्ता गमवावी लागली होती. त्या पराभवातून ते दशकभर सावरू शकले नव्हते. आंध्र प्रदेशातील राजकीय नाट्याचं प्रतिबिंब अलीकडंच समाप्त झालेल्या संसदेच्या अधिवेशनातही पडलं. या अधिवेशनामध्ये जगन रेड्डींच्या वायएसआर काँग्रेस पक्षानं मोदी सरकारविरोधात अविश्वासाचा पहिला ठराव मांडला. त्यामुळं सरकारविरोधात असाच ठराव मांडणं नायडूंना भाग पडलं. परंतु यातील कोणताच ठराव चर्चेसाठी सभागृहात आला नाही.

दहा वर्षं विरोधकांच्या बाकड्यांवर बसल्यानंतर २०१४ साली नायडू पुन्हा सत्तेत आले, परंतु या वेळी आंध्र प्रदेशाची विभागणी झालेली होती. राज्याला विशेष प्रवर्ग दर्जा मिळवण्याच्या बाबतीत नायडूंनी पुरेसं प्रयत्न केले नसल्याची तीव्र टीका त्यांच्यावर झालेली आहे. शिवाय, राजधानी अमरावती आणि पोलावरम सिंचनप्रकल्प यांकरिता भूसंपादन करण्याची प्रक्रिया त्यांनी ज्या पद्धतीनं हाताळली त्यावरही कठोर टीका होते आहे. नागरी समाज आणि स्वतःची जमीन व उपजीविका गमावणाऱ्या लोकांकडून या प्रकल्पांना बराच प्रतिकार होतो आहे. 'राज्य पुनर्रचना अधिनियम, २०१४'ची अंमलबजावणी व्हावी अथवा नवीन राज्य उभारणीसाठी पुरेसा वित्तपुरवठा व प्रकल्प दिले जावेत, याकरिता नायडूंना केंद्र सरकारशी असलेल्या संपर्काचा वापर करता आला नाही. या अपयशांमुळं लोकभावना नायडू सरकारविरोधात गेली आहे. परिणामी, तेदच्या 'कार्यक्षम प्रशासनाचा आदर्श' या प्रतिमेला तडा गेला आहे. हैदराबादमध्ये २०००च्या दशकात माहिती तंत्रज्ञान क्षेत्र विकसित करून नायडूंनी ही प्रतिमा कमावली होती. परंतु आता काहीशा कलुषित प्रतिमेसोबत मे २०१९मध्ये होणाऱ्या निवडणुकांना तेद सामोरा जाणार आहे.

रालोआतून नायडू बाहेर पडले, त्यामुळे स्वतःच्या बळावर आंध्र प्रदेशात वाटचाल करायचा भाजपचा प्रयत्न आहे. परंतु, राज्यातील निवडणुकांमधील भाजपची आधीची कामगिरी पाहाता, त्यांच्या तिथल्या स्वतंत्र वाटचालीला फारसं यश मिळण्याची शक्यता नाही. २०१४ साली राज्यातील २५ लोकसभेच्या जागांपैकी

भाजपला केवळ दोन जागांवर विजय मिळाला, तर तेदला १५ जागांवर विजय मिळाला आणि वायएसआर काँग्रेस पक्षाला आठ जागा जिंकता आल्या. यापूर्वीची भाजपची सर्वांत चांगली कामगिरी संयुक्त आंध्र प्रदेशात १९९९ साली झाली होती; त्यावेळी भाजपनं तेदशी युती करून विधानसभेच्या व संसदेच्या निवडणुका लढवल्या होत्या आणि त्यात भाजपला सात जागांवर यश मिळाले होते. आंध्र प्रदेशात फारशी राजकीय ताकद नसलेल्या भाजपनं आघाडीतील आपल्या भागीदार पक्षाच्या आणि राज्यातील जनतेच्या अपेक्षांकडं दुर्लक्ष केलं, त्यामुळं हा पक्ष लोकांपासून आणखीच दुरावला आहे. तेदला मुख्यत्वे कम्मा समुदायाच्या लोकांकडून दीर्घ काळ पाठिंबा मिळत आलेला आहे; वायएसआर काँग्रेस पक्षाला रेड्डी, दलित व ख्रिस्ती समुदायांमध्ये चांगला जनाधार आहे; कल्याण यांना त्यांच्या चित्रपटांचे चाहते व कपू समुदाय यांचा पाठिंबा आहे; परंतु भाजपला असा कोणताच ठोस जनाधार नाही.

स्वतःसाठी राज्यात पाया तयार करण्याकरिता भाजप कपू समुदायानं ‘इतर मागासवर्गीय’ (ओबीसी) दर्जासाठी केलेल्या मागणीचा फायदा उठवण्याचा प्रयत्न करतो आहे. हे लक्षात घेता राज्यातील पक्षशाखेसाठी नवीन अध्यक्ष नियुक्त करण्याचा भाजपचा विचार सुरू आहे. यापूर्वी कपू समुदायाला एकत्र आणण्याचा ठोस प्रयत्न पवन कल्याण यांचे ज्येष्ठ बंधू व अभिनेते चिरंजीवी यांनी केला होता. २००९ सालच्या निवडणुकांपूर्वी त्यांनी प्रजा राज्यम पार्टीची स्थापना केली होती. निवडणुकांमध्ये या पक्षाची कामगिरी निराशाजनक झाली आणि शेवटी २०११ साली हा पक्ष काँग्रेसमध्ये विलीन झाला. आता राज्यातील राजकीय कथनाला नवी दिशा देण्याची भाजपची खटपट सुरू आहे: मोदींनी आंध्र प्रदेशचा विश्वासघात केला, या मुद्द्याऐवजी बऱ्यापैकी मोठ्या कपू समुदायाच्या राखीव जागांच्या मागणीला केंद्रस्थानी आणायचा भाजपचा प्रयत्न आहे. हा समुदाय प्रभुत्वशाली असला तरी त्यांचा सक्षम राजकीय आवाज नाही.

आंध्र प्रदेशात पाय रोवण्यासाठी भाजपची खटपट सुरू असताना दाक्षिणात्य राज्यांमध्ये स्वतःची जागा तयार करण्यासाठी व्यापक व्यूहरचनाही आखली जाते आहे. उदाहरणार्थ, तामीळनाडूलाही भाजपनं आपला विश्वासघात केल्यासारखं वाटतं. कर्नाटकातील आगामी निवडणुकांवर लक्ष ठेवून कावेरी पाणीवादामध्ये भाजप कर्नाटकाला झुकतं माप देतो आहे, अशी तामीळनाडूतील लोकांची धारणा आहे. शिवाय, पंधराव्या वित्त आयोगाच्या संदर्भअटींच्या केंद्रीकरणवादी स्वरूपामुळं आपला वित्तीय अवकाश संकुचित होईल, अशी भीतीही बहुतांश दाक्षिणात्य राज्यांना वाटते.

आंध्र प्रदेशचं विभाजन झालं, त्यावेळी काही प्रादेशिक नेते भाजपच्या गोटात येऊन दाखल झाले होते, परंतु २००९च्या विधानसभा आणि सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पुन्हा अशा नेत्यांना आकर्षित करणं भाजपला जड जाणार आहे. २००९ साली मोदींची प्रतिमा महाकाय स्वरूपाची होती आणि भाजप चढत्या मार्गाला होता. पण आपल्या भागीदारांच्या गरजा वा राज्य सरकारांच्या मागण्या यांकडं दुर्लक्ष केल्यामुळं भाजपचा राजकीय अवकाश घटतो आहे. सबळ प्रादेशिक राजकीय पक्ष स्पर्धेत असताना भाजपचा आंध्र प्रदेशातील व इतर दाक्षिणात्य राज्यांमधील राजकीय प्रकल्प अधिकाधिक अडचणींमध्ये अडकण्याची शक्यता दिसते आहे.

●

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक मुंबईत मिळण्याचे ठिकाण**

पीपल्स बुक हाऊस

मेहेर कॉम्प्लेक्स, कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट,
मुंबई ४००००१

# कठुआची आठवण ठेवायला हवी

*धर्म आणि राजकारणाच्या नावावर विकृती, हिंस्रता आणि अन्याय यांचं समर्थन करावं का, हा प्रश्न विचारणं आत्यंतिक निकडीचं बनलेलं आहे.*

जम्मूपासून ७२ किलोमीटरवरील कठुआजवळच्या गावात राहाणाऱ्या बखेरवाल-गुज्जर समुदायातील एका आठ वर्षीय मुलीवर सलग काही दिवस बलात्कार करून नंतर तिची निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनाक्रमाचा सर्व तपशील भयंकर आहे. परंतु कथित अपराध्यांना पोलिसांनी अटक केल्यानंतर जे काही घडलं ते तर आणखीच भयकारी आहे, आपल्या समाजाला गेलेले तडेच यातून उघड झाले आहेत. एका बालकाचा बलात्कार व खून झाल्यावर त्या घटनेचा वापर करून जमातीय तिरस्काराला खतपाणी घालण्यात आलं, गुन्हेगारांना राजकीय पातळीवर संरक्षण पुरवलं गेलं, इतक्या हीन पातळीला आपण कसे काय पोचलो?

१० जानेवारी रोजी ही मुलगी बेपत्ता झाली, १७ जानेवारीला तिचा छिन्नविछिन्न झालेला देह सापडला. या दरम्यानच्या काळात तिला सहन करावे लागलेले अत्याचार म्हणजे मानवी विकृतीचं अतिशय हिंस्र रूपच होतं. एका बालिकेचं अपहरण करणं, तिला गुंगीचं औषध देणं, मंदिरात कोंडून ठेवणं, वारंवार मारहाण करून बलात्कार करणं आणि नंतर खून करून शव फेकून देणं- हे सगळंच क्रौर्याची परिसीमा गाठणारं आहे. यातील अपराध्यांमध्ये स्थानिक पोलिसांमधील काही कर्मचाऱ्यांचाही समावेश होता, हे त्याहून भयानक आहे. आपली मुलगी हरवल्याची तक्रार पालकांनी केल्यानंतर त्यांच्यासोबत गेलेल्या शोधपथकामध्येही यांपैकी एक पोलीस कर्मचारी सहभागी होता. ही मुलगी कुठं आहे आणि तिच्यासोबत काय केलं जातंय, याची पूर्ण कल्पना या व्यक्तीला होती.

मुलीचं शव सापडल्यानंतर राज्य सरकारने तपासाचे आदेश दिले, त्यानंतर संशयितांना ताब्यात घेण्यात आलं, आणि मग या मुद्द्यावरून राजकारणाची सुरुवात झाली. बलात्कार व खुनाचा धिक्कार करून न्यायाची मागणी करण्याऐवजी राजकारणी आणि अगदी वकिलांनीही आरोपींची बाजू उचलून धरली. जम्मू-काश्मीर पोलिसांची क्षमता व निःपक्षपातीपणा यांवरच या मंडळींनी शंका उपस्थित केल्या. हे प्रकरण केंद्रीय अन्वेषण विभागाकडं सोपवावं, अशी मागणी या लोकांनी केंद्र सरकारकडं केली. बलात्काराच्या गुन्ह्यातील संशयितांना अशा उघड पद्धतीनं मिळणारा पाठिंबा अभूतपूर्व आहे. हिंदू एकता मंच या संघटनेनं आरोपींना न्याय मिळावा यासाठी राष्ट्रध्वज फडकावत मोर्चा काढला. या मोर्चाला भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) सदस्यांनी पाठिंबा दिला होता. या प्रकरणात आरोपपत्र दाखल करण्यासाठी आलेल्या पोलिसांनी वकिलांनी प्रत्यक्ष शारीरिक पातळीवर येऊन प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला. एका लहानग्या मुलीवर बलात्कार झाला, अत्याचार झाला आणि तिचा खून करण्यात आला, ही बाब या सगळ्या गदारोळात हरवूनच गेली.

या घडामोडींना अर्थातच एक व्यापक राजकीय संदर्भ आहे. पीपल्स डेमॉक्रेटिक पार्टीसोबत आघाडी केलेल्या भाजपला हिंदूबहुल जम्मूच्या माध्यमातून या राज्यात ठाम पाय रोवायची संधी मिळाली. या अडचणीच्या आघाडीनंतरही जम्मू आणि काश्मीर खोरं यांच्यातील जमातीय धृवीकरणाच्या राजकारणाची अवस्था कायमच आहे. त्यामुळं मुस्लीम बालिकेवरील बलात्कार आणि हिंदू संशयितांना अटक, हा तपशील जमातवादी भडका उडवण्यासाठी पूरक ठरला. एका

अल्पवयीन मुलीच्या मृत शरीरावर असा हिंस्र राजकीय नाच करणाऱ्या घडामोडींनी भारतीय राजकारणातील नवीन हीन पातळी दाखवून दिली आहे.

या बलात्कार व खून प्रकरणाविषयी संताप व्यक्त करत असतानाच आपण व्यापक संदर्भ लक्षात घेण्याचीही गरज आहे. एक, या देशामध्ये बालकांवरील लैंगिक अत्याचार, बलात्कार व कौटुंबिक हिंसाचार मोठ्या प्रमाणात आढळतो. केवळ सांख्यिकी आकडेवारीवरून हे वास्तव पूर्णतः समजून येत नाही. महिलांवर आणि मुलींवर त्यांच्या घरात, त्यांच्या शेजारामध्ये, रस्त्यावर, शिवारामध्ये, वनांमध्ये, सर्वत्र अत्याचार होतात, लैंगिक हल्ले केले जातात. कठोर कायद्यांनी या परिस्थितीत फारसा फरक पडलेला नाही. २०१२ साली 'लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांना संरक्षण अधिनियम' करण्यात आला. २०१३ साली बलात्कारविषयक कायदे अधिक कठोर करण्यात आले आणि मृत्युदंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली. तरीही बलात्कार आणि बालकांवरील अत्याचारांचं प्रमाण कमी झालेलं नाही. कायद्यांची अंमलबजावणी करणाऱ्या व्यवस्था कार्यरत असतील तरच कायदे परिणामकारक ठरतात.

दोन, ही घटना जम्मूमध्ये घडली हेही आपण लक्षात ठेवायला हवं. याच राज्यातील काश्मीर खोऱ्यात असंख्य बायकांवर आणि मुलींवर बलात्कार होतात, आणि तरीही उर्वरित भारतामध्ये त्याबद्दल कधीच संतापाची लाट उठत नाही. न्यायदानाच्या नेहमीच्या समस्यांसोबतच या प्रदेशातील महिलांना 'सशस्त्र दलं (विशेषाधिकार) अधिनियमा'तील तरतुदींचाही सामना करावा लागतो. बलात्कारासारख्या गुन्ह्यांपासूनही सशस्त्र दलाच्या जवानांना संरक्षक कवच पुरवण्याचं काम हा कायदा करतो.

तीन, दोन समुदायांमध्ये राजकारणाद्वारे तिरस्काराचं विष ओतलं जातं तेव्हा एकमेकांना धडा शिकवण्यासाठी स्त्रियांना लक्ष्य केलं जातं. फाळणीपासून आत्तापर्यंत अनेक ठिकाणी हे घडताना आपण पाहिलेलं आहे आणि असे प्रकार थांबलेले नाहीत. पण आजच्या अशा तिरस्कार पेरणाऱ्या घटकांमध्ये आत्मविश्वास भरून राहिलेला आहे, कारण आपल्या संरक्षणासाठी आवश्यक सत्ता आपल्या समर्थकांकडं आहे याची त्यांना पूर्ण जाणीव असते. अन्यथा या बालिकेच्या खुनातील आरोपींना इतक्या निर्लज्ज स्वरूपात पाठिंबा मिळाला नसता.

इतर मुलींना अशाच प्रकारच्या नियतीला सामोरं जावं लागू नये, यासाठी व्यवस्थात्मक बदलांची मागणी होणं गरजेचं आहे. पीडितांसाठी मदतीचं पहिलं ठिकाण पोलीस स्थानक हे असतं. पण इथं त्यांना सहानुभूतीचा अनुभव येत नाही. तक्रार नोंदवून घेतली आणि तपास झाला तरीही न्याय मिळेल याची आशा अत्यल्प असते. दुर्बल तपास आणि बेफिकीर वकील यांमुळं असे खटले अपयशी ठरणार असल्याचं जवळपास निश्चितच झालेलं असतं. आपली न्यायदान व्यवस्था मोडकळीस आलेली आहे, तिच्या दुरुस्तीची गरज आहे.

स्त्रियांविरोधातील गुन्ह्यांबाबतच्या चर्चेमध्ये १६ डिसेंबर २०१२ हे एक निर्णायक वळण ठरेल, असं आपल्याला वाटत होतं. या लहान मुलीचा मृत्यूसुद्धा अशाच निर्णायक स्वरूपाचा प्रसंग आहे. आपला समाज कुठल्या दिशेनं जातो आहे, असा प्रश्न प्रत्येक भारतीयानं अशा घटनेनंतर विचारायला हवा. विकृती, हिंस्रता व अन्याय यांचा स्वीकार करणारा आणि धर्म व राजकारणाच्या नावावर अशा कृत्यांचं समर्थन करणारा हा समाज बनणार आहे का? सर्व जीव मूल्यवान असतात आणि गुन्हेगारीला धर्म नसतो, हे आपल्या लक्षात राहावं यासाठी मानवतेची ज्योत तेवत राहील का?

●

# कायदा हातात घेणारे वकील

*न्यायप्रक्रियेमध्ये अडथळा आणणाऱ्या वकिलांच्या संघटनांवर चाप बसवण्याचं काम राज्य वकील परिषदांनी करायला हवं.*

कठुआजवळ आठ वर्षांच्या मुलीवर बलात्कार होऊन तिचा खून झाल्याप्रकरणी आरोपपत्र दाखल करण्यापासून पोलिसांना प्रतिबंध करण्याचा प्रयत्न काही निदर्शकांनी आणि जम्मूतील वकील संघटनांनी केल्याची घटना अलीकडंच घडली. वकीलच किती बेकायदेशीर वागू शकतात, हे या निमित्तानं पुन्हा एकदा दिसून आलं. आरोपपत्र दाखल करण्यामध्ये अयशस्वी अडथळा आणून वकिलांचा हा गट थांबला नाही, तर त्यांनी संपही जाहीर केला. त्यामुळं जम्मू-काश्मीर उच्च न्यायालयाचं कामकाज ठप्प झालं होतं. या प्रकरणी ११ एप्रिल रोजी बंद पाळावा, असं खुलं आवाहनही त्यांनी नागरी समाजाला केलं. शिवाय, कठुआ बलात्कार पीडितेच्या कुटुंबियांच्या वकिलानं या खटल्यापासून दूर व्हावं यासाठी त्याला या वकील-गटानं धमकीही दिल्याचं सांगितलं जातं. वकिलांच्या या अडथळा आणणाऱ्या वर्तनाची स्वतःहून दखल घेऊन सर्वोच्च न्यायालयानं त्यांच्यावर ताशेरे ओढले, त्यानंतर उच्च न्यायालयाचं पुन्हा कामकाज सुरू झालं.

'माजी कप्तान हरिश उप्पल विरुद्ध भारतीय संघराज्य' (२००३) या खटल्यात सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निकालपत्रात स्पष्ट म्हटलं आहे की, वकिलांना संपावर जाण्याचा किंवा बहिष्काराचं आवाहन करण्याचा किंवा प्रतिकात्मक संप करण्याचाही अधिकार नाही. परंतु, वकिलांच्या संघटना या आदेशाचं पालन करताना दिसत नाहीत. संपाचं अथवा बहिष्काराचं आवाहन करण्याच्या विचारार्थ बैठक बोलावण्याला कोणतीही वकील परिषद (बार कौन्सिल) वा वकील संघटना (बार असोसिएशन) परवानगी देऊ शकत नाही. अशा बैठकीची मागणी करण्यात आली तर त्याकडं दुर्लक्ष केलं जावं, असंही सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केलेलं होतं.

इतक्या वर्षांमध्ये झालेले वकिलांचे संप, बहिष्कार आणि धमकावणी वजा 'निदर्शनं' यांचा न्यायालयांशी वा न्यायव्यवस्थेच्या कामकाजाशी फारसा संबंध नव्हताच. २०१६ साली दिल्लीतील पतियाळा न्यायालयाच्या आवारात काही वकिलांनी पत्रकारांना व जवाहरलाल नेहरू विद्यापिठातील विद्यार्थी-नेत्यांना धक्काबुक्की केल्याचं वृत्तवाहिन्यांवरून दाखवण्यात आलं होतं. आपण हे कृती 'राष्ट्रीय' कर्तव्याचा भाग म्हणून केली असल्याचं आत्मसमर्थनही या वकीलमंडळींनी केलं होतं. त्याच वर्षी बंगळुरूमधील वकिलांनी पोलिसांसोबत झालेल्या संघर्षात हिंसाचार केल्याची घटना घडली, तर केरळमध्ये वकिलांनी प्रदीर्घ संप केला आणि त्याला अनेकदा वाकडं वळण लागलं.

मे २००८मध्ये लखनौमधील एक वकील मोहम्मद शोएब यांना फैझाबाद न्यायालयातील काही संतप्त सहवकिलांनी लक्ष्य केलं, कारण या वकिलांच्या मते शोएब एका 'दहशतवाद्या'चा बचाव करत होते. किंबहुना, 'दहशतवादी' मानल्या जाणाऱ्या प्रतिसादकांच्या बचावापासून आपल्या सदस्यांना प्रतिबंध करणारे ठराव अनेक वकिलांच्या संघटना करत असतात. बस्तरमध्ये माओवाद्यांना मदत करत असल्याच्या नावाखाली 'जगदलपूर लीगल एड ग्रुप'च्या सदस्यांना शहर सोडून जाण्याची सक्ती करण्यात आली. भारतीय वकील परिषदेच्या नियमांमधील 'व्यावसायिक वर्तन व शिष्टाचारविषयक प्रमाणमूल्यां'च्या यादीतील नियम क्रमांक ११चा स्पष्ट भंग यातून होतो. न्यायालयं वा लवाद वा इतर कोणत्याही अधिकारीसंस्थेमधील अथवा जिथे संबंधित वकील व्यवसाय करत असेल, त्या ठिकाणी सुपूर्द करण्यात आलेलं कोणतंही काम स्वीकारणं वकिलानं स्वीकारणं बंधनकारक आहे.

त्यासाठी वकिलीमधील त्याच्या दर्जाशी व संबंधित खटल्याच्या स्वरूपाशी सुसंगत असं शुल्क त्यानं घ्यावं. विशेष परिस्थितीमध्येच फारतर एखादी जबाबदारी न स्वीकारण्याच्या त्याच्या नकाराचं समर्थन होऊ शकेल, असं या नियमात म्हटलेलं आहे.

वकील परिषदा या वैधानिक मान्यता असलेल्या नियामक संस्था असतात. तर, आपल्या मागण्यांसाठी बहिष्कार अथवा निदर्शनांचा मार्ग वेळोवेळी चोखाळण्याचं काम वकील संघटना करतात. वकिलांच्या दैनंदिन कामकाजावर या संघटनांचा प्रभाव असतो आणि बहुतांश वकील या संघटनांच्या आदेशांचं पालन करतातच. वकिलांच्या व या संघटनांच्या गैरवर्तनावर वचक ठेवणं आणि त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणं, हा अधिकार वकील परिषदांचा असतो. अशा कारवाईसाठीचे वैधानिक अधिकारही या परिषदांना दिलेले असतात. परंतु, विशिष्ट बचावकर्त्याचा पक्ष मांडण्यापासून आपल्या सदस्यांना प्रतिबंध करणाऱ्या वा संपाचं आवाहन करणाऱ्या वकिलांना आणि संघटनांना खीळ बसवण्यासाठी या वकील परिषदांनी अशी कोणतीही कारवाई कधी केलेली नाही. किंबहुना, प्रस्तुत प्रकरणामध्ये तर सर्वोच्च न्यायालयाला पुढाकार घेऊन या संघटनांना तंबी द्यावी लागली.

वकिलांकडून वारंवार होणारे संप आणि निदर्शनं यांमुळं न्यायालयांमधील प्रलंबित खटल्यांची संख्याही वाढत जाते. भारतीय कायदा आयोगानं २०१७ सालच्या २६६व्या अहवालात नमूद केल्यानुसार, केवळ कनिष्ठ न्यायालयांमधील प्रलंबित खटल्यांची संख्या अडीच कोटी इतकी आहे आणि वकिलांच्या संपांमुळं वाया गेलेला न्यायिक वेळ हे यामागील एक मुख्य कारण आहे. गैरवाजवी प्रमाणात न्यायालयीन कामकाज स्थगित होण्यालाही वकिलांची निदर्शनं अंशतः कारणीभूत आहेत.

भारतीय समाजामध्ये वकिलांमध्ये बरीच प्रतिष्ठा मिळते आणि बचावाची व न्याय मागण्याची वेळ आली की प्रत्येक जण त्यांच्याकडं जात असतो. विशेषतः आरोपींमधील गरिबांना वकिलांकडून आशा वाटत असते. कायद्याचं राज्य आणि लोकशाही अधिकारांचा बचाव या गोष्टी मुख्यत्वे वकिलांच्या कामकाजावर आणि कार्यनीतीवर अवलंबून असतात. त्या-त्या राज्यांच्या वकील परिषदांनी वकिलांच्या संघटनांवर नियंत्रण व देखरेख ठेवण्याचं काम अधिक कसोशीनं करण्याची गरज आहे. शिवाय, कायदाविषयक शिक्षण देताना कायदेशीर नीतीमूल्यांना अभ्यासक्रमात ठोस स्थान द्यायला हवं. संपाचं आवाहन करण्याऐवजी प्रसारमाध्यमांना निवेदनं देऊन अथवा न्यायालयीन आवारांबाहेर शांततापूर्ण निदर्शनं करून वकील निदर्शनं करू शकतात, जेणेकरून आपल्या व्यवसायातील कायदेशीर व नैतिक जबाबदाऱ्यांना बाधा पोचणार नाही.

परंतु, कठुआ व जम्मूत पाहायला मिळालं त्याप्रमाणे, कायद्याचे रक्षक असलेले वकीलच निदर्शनांवेळी व संपांवेळी हिंसक जमावासारखे वागायला लागले, तर आपल्या मुलीवर बलात्कार करणाऱ्या व तिचा खून करणाऱ्या अपराध्यांना शिक्षा होईल अशी आशा संबंधित गरीब कुटुंबाला कशी वाटावी? कायद्याचं रक्षण करण्याचं काम वकील योग्यरित्या पार पाडत आहेत किंवा नाही, याची खातरजमा करण्यासाठी भारतीय वकील परिषदेनं ठोस कृती करून स्वतःच्या स्वयंनियामक यंत्रणेचं वेळीच सबलीकरण करणं अत्यावश्यक आहे.

●


**वाटसरूची वर्गणी पाठवण्याचा / पत्रव्यवहाराचा नवा पत्ता**

परिवर्तनाचा वाटसरू
५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ,
फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११
भ्र. ७७७६९०२२६७

# वेतनाशिवाय काम

*वेतन देण्यामध्ये होणारा विलंब आणि वेतनामधील अपुरी वाढ यांमुळं रोजगार हमी योजनेचा गाभाच विरत चालला आहे.*

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाखाली किमान उत्पन्नाची हमी मिळण्याचा अधिकार अंमलात यायचा असेल, तर वेळेत वेतन दिलं जाणं मध्यवर्ती महत्त्वाचं ठरतं. राष्ट्रीय रोजगार हमी योजना संघर्ष मोर्चा ही संस्था या अधिनियमाच्या अंमलबजावणीचा माग ठेवते. तिच्या आकडेवारीनुसार फेब्रुवारी, मार्च व एप्रिल या महिन्यांसाठीचं अनुक्रमे ६४ टक्के, ८६ टक्के आणि ९९ टक्के वेतन काढण्यात आलेलं नाही. वेतन न दिलं जाणं किंवा विलंब होणं हे रोजगार हमी योजनेसाठी नवीन नाही, पण वेतनरचनेमध्ये झालेल्या अलीकडच्या काही बदलांनी परिस्थिती आणखी खालावली आहे.

नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड मॅनेजमेन्ट सिस्टीमद्वारे (एनईएफएमएस) 'वेतनप्रक्रियेमध्ये गळती होऊ नये' यासाठी नरेंद्र मोदी यांच्या सरकारनं फंड ट्रान्सफर ऑर्डरद्वारे (एफटीओ) वेतन काढण्याचे आदेश दिले. 'आधार' क्रमांकाशी जोडलेल्या बँक खात्यांद्वारे वेतन वितरित करण्याची व्यवस्था नंतर अंमलात आणण्यात आली. कोणत्याही गळतीविना वेतन कामगारांपर्यंत जाईल, याची खातरजमा करणं प्रशंसनीय आहे, परंतु तळपातळीवरील त्याची व्यवहार्यता आणि परिणाम हे मात्र चिंतेचे विषय आहेत. कालांतरानं अशा उपायांच्या अंमलबजावणीमध्ये सुधारणा करता येईलही, पण विकेंद्रित सहभागाधारित विकासाच्या प्रक्रियेला उलटं फिरवण्याचं काम त्यातून होतं.

चक्राकार निधीच्या आधीच्या रचनेमध्ये प्रत्येक पातळीवरील अंमलबजावणी संस्थांची स्वतःची खाती असायची आणि वेतन वितरित करण्यासाठी त्यांचे अधिकृत स्वाक्षरीदार असायचे. स्थानिक संस्थांद्वारे विकेंद्रित विकासाला बळ मिळावं यासाठी वरून खाली निधी हस्तांतरणाची ही व्यवस्था लावण्यात आलेली होती. 'एनईएफएमएस'नुसार भारत सरकारच्या नियंत्रणाखालील एकाच खात्यावर निधी केंद्रित होऊन राहातो. अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना पैशाचे वाटप केवळ सांकल्पनिक पातळीवर होत असे. अंमलबजावणीकर्त्या संस्था हजेरीपत्रकानुसार एफटीओद्वारे वेतनासाठीचे दावे तयार करत असत. एफटीओ तयार झाल्यानंतर कार्यक्रम-अधिकारी वेतनवाटपासाठी ते अपलोड करत असे. पुरवठादारांना सामग्रीखर्चासाठी दिले जाणारे पैसे, मानवी हस्तक्षेपापासूनचं प्रक्रियाशुल्क आणि गळतीसंदर्भातील शुल्क अशा सर्वांसाठी ही प्रक्रिया सारखीच असायची. परंतु या प्रक्रियेमध्ये काही कमकुवत करणाऱ्या त्रुटी होत्या.

एक, प्रलंबित एफटीओंचा प्रश्न निर्माण झालेला आहे. मॅनेजमेन्ट इन्फर्मेशन सिस्टीमच्या (एमआयएस) आकडेवारीनुसार, २०१७-१८ या वर्षातील एकूण एफटीओंपैकी १९.५५ टक्के १९ एप्रिल २०१८ रोजीपर्यंत प्रलंबित होती आणि २.३८ टक्के एफटीओ नाकारण्यात आली होती. एकूण एफटीओंपैकी यांचं प्रमाण २१.९३ टक्के येतं. विविध राज्यांमधून मिळालेल्या माहितीनुसार, काही वेळा रक्कम रोजगार हमी योजनेवरील कामगारांच्या व पुरवठादारांच्या खात्यांवर तीन ते चार महिन्यांनी जमा केली जाते, काही वेळा तर याहून अधिक वेळ लागतो. हे सर्व प्रलंबित एफटीओंमुळं घडतं. अनेक राज्यांमधील प्रलंबित वेतन थकबाकी आणि सामग्रीविषयक रक्कम यांसंबंधीच्या वाढत्या पुराव्यातून या आकडेवारीला आधार मिळतो.

केंद्र सरकारनं थकबाकी वितरित केली नाही, तर

राज्यांना स्वतःच्या स्त्रोतांमधून या रकमा देणं शक्य होणार नाही, आणि आधीप्रमाणेच ती केंद्र सरकारकडून याची मागणी करतील. २०१६-१७ या वर्षामध्ये १२,००० कोटी रुपयांची (म्हणजे या कार्यक्रमासाठीच्या अर्थसंकल्पीय तरतुदीच्या जवळपास एक चतुर्थांश) संचित थकबाकी असताना झारखंड व त्रिपुरा यांसारख्या राज्यांनी आपल्या स्त्रोतांमधून कामगारांना वेतन दिलं. आता एनईएफएमसीद्वारे हे करणं शक्य नाही. कार्यक्रमाअंतर्गत केलेल्या १५ दिवसांच्या कामानंतर वेतन मिळणं हा कामगारांचा हक्क आहे, परंतु या प्रक्रियेतून या अधिकाराचा भंग होतो आहे. 'वेतनाची हमी' नसेल, तर या कार्यक्रमाला काही अर्थच राहात नाही. त्यामुळं या योजनेविषयी कामगारांनाही खात्री वाटत नाही, मग ते अधिक धोकाग्रस्त कामांकडं वळतात आणि तणावाखाली स्थलांतर करतात. आपल्या प्राथमिक गरजा भागवण्यासाठी गरीबांना दैनंदिन पातळीवर रोख रक्कम लागते, अशा वेळी त्यांना या कार्यक्रमापासून दूर राहाणं भाग पडतं आणि पर्यायी रोजगार शोधावा लागतो. वेतन मिळण्यास होणारा विलंब आणि त्यासंबंधीची अस्थिरता यांमुळं या कार्यक्रमाचा आत्माच हिरावला जातो.

दोन, केंद्रिकृत यंत्रणेमुळं पंचायती राज संस्थांच्या सबलीकरणाची प्रक्रिया उलटी फिरवली जाते. संघराज्यीय घटनात्मक व्यवस्थेमध्ये पंचायती राज संस्था गेली २५हून अधिक वर्षं अस्तित्वात आहेत, परंतु सत्ता, कार्ये आणि पदाधिकारी यांच्या संदर्भातील हस्तांतरणाबाबत उणीवा राहिल्यामुळं ही रचना दुर्बल राहिलेली आहे. रोजगार हमी योजनेनं एकाच वेळी हे तीनही मुद्दे सोडवले होते. पहिल्यांदाच अनेक राज्यांमध्ये ग्रामपंचायतींनी रोजगार हमी योजनेसाठी बँकांमध्ये खाती उघडली, आणि नियमितपणे त्यांच्या खात्यांवर पैसे जमा होत होते. ग्रामपंचायतींचं सबलीकरण करणाऱ्या या प्रक्रिया एनईएफएमएस आणि एफटीओ या यंत्रणांच्या आगमनानंतर ठप्प झाल्या.

प्रलंबित वेतनांकडं तत्काळ लक्ष देणं गरजेचं आहे, पण वेतनविषयक धोरणाचाच पुनर्विचार करण्याचीही तितकीच गरज आहे. ग्रामविकास मंत्रालय दर वर्षी शेतमजुरांसाठी असलेल्या ग्राहक किंमत निर्देशांकांचा आधार घेऊन वेतनांच्या रकमेत सुधारणा करतं. अनेक राज्यांमध्ये शेतमजुरांसाठीचं किमान आणि प्रत्यक्षातलं वेतन रोजगार हमी योजनेतल्या वेतनापेक्षा जास्त आहे. ही योजना २००६ साली सुरू झाली तेव्हाच्या तुलनेत ही उलटीच वाटचाल झाली, असं म्हणावं लागेल. आरंभीच्या वर्षी रोजगार हमी योजनेखाली किमान वेतन ६० रुपये होतं, तेव्हा अनेक राज्यांमध्ये निर्धारित शेतकी वेतन आणि प्रत्यक्षातील वेतन यापेक्षा कमी होतं. त्यामुळं अनौपचारिक क्षेत्रातील कामगारांसाठी ही योजना अतिशय आकर्षक ठरली होती. ग्रामीण श्रम बाजारपेठांमध्ये वेतनाची सुधारणा वरच्या दिशेनं होऊ लागली. परंतु, या परिस्थितीचा उलटा प्रवास झाल्यामुळं आता अनेक राज्यांमधील कामगारांसाठी रोजगार हमी योजना अनाकर्षक ठरली आहे. या पार्श्वभूमीवर, महिला कामगार या योजनेखालील कामांमध्ये सहभागी होतात, तर पुरुष कामगार अधिक वेतनाच्या पर्यायी रोजगारांचा शोध घेतात, हे चित्रही पुरेसं सूचक आहे.

विद्यमान वेतन दरापेक्षा कमी असलेल्या किमान वेतन दर देणं, हे केवळ कायदेशीर हमीसारखं झालं. ही हमी प्रत्यक्षात उतरावी, यासाठी वेतनांमध्ये सुधारणा करायला नको का? वेतनाची आणि विद्यमान बाजारपेठीय दरांशी सुसंगत किमान व्यवहार्य वेतन दराची हमी मिळणं, हे रोजगार हमी योजनेच्या उद्देशपूर्तीसाठी अपरिहार्य आहे.

●

## सिरियाला न्याय

*युद्धजर्जर सिरियामध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी बहुआयामी प्रतिसादाची गरज आहे.*

सिरियन सरकारनं ७ एप्रिल रोजी कथितरित्या रासायनिक अस्त्रांचा वापर केल्यामुळं नागरिकांचा मृत्यू झाला. अमेरिका आणि तिच्या साथीदार देशांकडून बशर अल-अस्साद यांच्या सरकारविरोधात सुरू असलेल्या सैनिकी कारवाईची पुढची फेरी सुरू करण्यासाठी या घटनेचा उपयोग करून घ्यायची सुरुवात झाली आहे. गेली आठ वर्षं सुरू असलेल्या या संघर्षात हजारो लोक मृत्युमुखी पडले आहेत वा जखमी झाले आहेत. या संघर्षाचे मानवी परिणाम प्रचंड आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या निर्वासितविषयक उच्चायुक्तांनी म्हटल्यानुसार, २०११पासून सुरू झालेल्या या संघर्षादरम्यान ५४ लाख लोकांनी सिरियातून बाहेर पडून विविध देशांमध्ये निर्वासित म्हणून आश्रय घेतला आहे. शिवाय, ६१ लाख लोक देशांतर्गत विस्थापितांचं जगणं जगत आहेत आणि अनेक लोक देशाच्या विविध भागांमध्ये संघर्षात अडकून पडले आहेत.

अस्साद यांच्या सरकारविरोधात देशात सुरू झालेल्या सुरुवातीच्या निदर्शनांमधून राज्यसंस्थाबाह्य सशस्त्र गटांची निर्मिती झाली, त्यातून देशांतर्गत सशस्त्र संघर्ष सुरू झाला. सिरियन सरकारला पाठिंबा देत रशियानं या संघर्षात उडी घेतली आणि इस्लामिक स्टेटशी लढण्यासाठी अमेरिका व तिच्या साथीदारांनीही यामध्ये हस्तक्षेप सुरू केला, तेव्हा परिस्थिती आणखी गुंतागुंतीची बनली. आपण स्वबचावासाठी, सामूहिक स्व-बचावासाठी मानवतावादी भूमिकेतून हस्तक्षेप करत असल्याचं समर्थन अमेरिका व तिच्या मित्रराष्ट्रांनी केलं. सशस्त्र मानवतावादी हस्तक्षेपाला आंतरराष्ट्रीय कायद्याच्या आधारावर कोणतंही समर्थन मिळत नाही. स्व-बचाव अथवा सामूहिक स्व-बचाव यांना कायदेशीर आधार नाही. दुसरीकडं, आपण सिरियन सरकारच्या निमंत्रणावरून या संघर्षात हस्तक्षेप केल्याचं समर्थन रशिया देतो. तर, अनेक सरकारी व बिगरसरकारी घटकांच्या सहभागामुळं हा संघर्ष गुंतागुंतीचा बनला आहे. या संघर्षातील सर्वच घटक सशस्त्र लढाईच्या कायद्यांना तिलांजली देऊन कारवाया करत आहेत, त्यातून मानवी संकट उभं राहिलं आहे, असं निरीक्षण अनेकांनी नोंदवलेलं आहे. या संघर्षाची आणखी अधोगती होऊ नये असं वाटत असेल तर विशिष्ट तत्त्वांना धरून सातत्यानं काही प्रयत्न करणं गरजेचं आहे.

एक, संयुक्त राष्ट्रांनी रचनात्मक राजनैतिक प्रयत्न सुरू करायला हवेत. यासाठी सैनिकी हस्तक्षेप व पाठबळाच्या रूपातील सर्व परकीय सहाभाग या संघर्षातून दूर करायला हवा. सिरियात सत्तापालट झाल्यानंतर हा हस्तक्षेप दूर केला जाईल, असं सांगितलं जातं. परंतु, परस्परांबाबत विश्वासाचं वातावरण निर्माण झालं, तर अस्साद सरकारशी राजनैतिक संवाद शक्य होईल आणि सैनिकी हस्तक्षेप बंद केला तरच हा संवाद परिणामकारक ठरेल. अशा प्रकारची कृती सिरियन सरकारला सूट देणारी आहे असं न मानता, सिरिया आणि तिथल्या लोकांची सार्वभौमता व प्रादेशिक ऐक्य यांचा आदर अधोरेखित करणारा हा निर्णय असेल, असं मानायला हवं. अशा प्रकारच्या कोणत्याही राजनैतिक संवादासाठी प्राथमिक बहुराष्ट्रीय मंच म्हणून संयुक्त राष्ट्रांचेच नाव पुढे येते. नकाराधिकार असलेले देश संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेमध्ये सिरियाबाबत असा कोणताही निर्णय होण्याला अडथळा आणत असले, तरीही या प्रश्नाबाबत तत्काळ संवाद सुरू करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेचा मंच सर्जनशीलरित्या वापरता येऊ शकतो.

मानवी संकटावर उपाय करणं, हा या संदर्भातील दुसरा महत्त्वाचा उपाय असेल. एक कोटी १० लाखांहून

अधिक सिरियन नागरिकांना मदतीची गरज आहे. सीमा पार करून गेलेले निर्वासित, देशांतर्गत विस्थापित आणि संघर्षात अडकलेले- असे विविध प्रकारचे लोक यांमध्ये आहेत. निर्वासितांच्या लोंढ्याविषयी पाश्चात्त्य राष्ट्रांनी गदारोळ करायला सुरुवात केली असली, तरी तुर्कस्तान, लेबनॉन आणि जॉर्डन यांसारख्या शेजारी राष्ट्रांनी बहुतांश निर्वासितांना आश्रय दिला आहे, हे वास्तव आहे. या लोकांना स्वतःच्या घरी परतण्यासाठी मार्ग उपलब्ध करून देण्याची तातडीची गरज आहे. यासाठी मोठ्या प्रमाणावर मानवतावादी उपाय करावे लागतीलच, शिवाय स्वदेशी परतल्यानंतर आपण सुरक्षित राहू असं आश्वासन निर्वासितांना मिळणंही गरजेचं आहे. त्याचबरोबर संघर्षोत्तर काळात आपलं जगणं पुन्हा उभारण्यासाठी त्यांना आर्थिक व सामाजिक मदतीची गरजही भासेल. यासाठी विविध देशांनी आणि मानवतावादी संघटनांनी संयोजित प्रयत्न करायला हवेत.

या संघर्षात मोठ्या प्रमाणावर मानवाधिकारांचा व कायद्यांचा भंग झालेला आहे, त्यावर उपाय करणंही तितकंच महत्त्वाचं आहे. 'इंटरनॅशनल कमिटी ऑफ द रेड क्रॉस' (आयसीआरसी) या संघटनेच्या अहवालानुसार, सिरियातील संघर्षामध्ये सर्वच घटकांनी आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्याचं नियमितपणे उल्लंघन केलेलं आहे. वेढा घालणं, नागरी प्रदेशांवर अवाजवी प्रमाणात हल्ले करणं, नागरिकांना लक्ष्य करणं आणि रुग्णवाहिका, पाणीपुरवठ्याची व्यवस्था व बाजारपेठा अशा नागरी सेवांवरही हल्ला चढवणं- अशी अनेक कृत्यं या संघर्षात घडलेली आहेत. संयुक्त राष्ट्रांनी सिरिया अरब प्रजासत्ताकाविषयी नेमलेल्या स्वतंत्र आंतरराष्ट्रीय चौकशी आयोगानं या संघर्षातील लैंगिक आणि लिंगभावाधारित हिंसाचारावर लक्ष केंद्रित केलं होतं.

संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेनंही सिरियातील आंतरराष्ट्रीय गुन्ह्यांविषयी आंतरराष्ट्रीय, निःपक्षपाती व स्वतंत्र प्रक्रिया पार पाडण्यासाठी २०१६ साली वेगळा मंच स्थापन केला आहे. भविष्यातील आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी सुनावण्यांसाठी उपयोगी पडावं या उद्देशानं सिरियातील जनअत्याचार व मानवाधिकारांचं भंग यांविषयीचा पुरावा जमवून त्याचं विश्लेषण करण्याचं काम या मंचाकडं देण्यात आलं आहे. ही परिस्थिती आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायालयाकडं सुपूर्द करण्याचे प्रयत्न यापूर्वी करण्यात आले तेव्हा त्यांना यश आलं नाही. इतर संघर्ष परिस्थितींसंदर्भातील गतकाळातील अनुभव बघता असं लक्षात येतं की, आंतरराष्ट्रीय गुन्हेविषयक सुनावणी निवडक पद्धतीनं घेतली जाते, आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील सत्तासंबंधांचाही त्यावर कथित प्रभाव पडलेला असतो. या मर्यादा असल्या तरीही जनअत्याचाराच्या परिस्थितीमध्ये गुन्हेगारी कार्यवाही झाल्यास आपल्याला न्याय मिळू शकतो, अशी भावना पीडितांमध्ये असते. त्यामुळं, आंतरराष्ट्रीय कायद्याखाली गुन्हे केल्याचा आरोप असलेल्या सर्वांविरोधात गुन्हेगारी कारवाई सुरू करण्यासाठी पावलं उचलायला हवीत. ही प्रक्रिया निःपक्षपाती आणि स्वतंत्र राहावी यासाठी स्थानिक व आंतरराष्ट्रीय सहभाग असलेल्या गुन्हेगारी लवादाची स्थापना करावी लागेल.

शांतता प्रस्थापित करण्याच्या कोणत्याही प्रयत्नात पीडित लोकांचा सहभाग आवश्यक असतो. शांतता प्रस्थापनेसाठी सरकार बदलण्याची गरज असेल, तर त्याचा निर्णय सिरियातील लोकांवर सोडायला हवा. इतर उपाय अंमलात आणण्यासाठी सत्ताबदल ही पूर्वअट मात्र असता कामा नये.

●

**अनु. : प्रतिनिधी**

शेवटचे सिरियावरील टिपण श्रीनिवास बुर्रा यांनी लिहिलेले आहे. बुर्रा हे नवी दिल्लीतील साउथ एशियन युनिव्हर्सिटीशी संलग्न आहेत.

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे. (१४ एप्रिल व २१ एप्रिल २०१८ या अंकांतून)

**वाटसरूचे अंक आपल्याला ई-प्रत स्वरूपातही मिळू शकतात.**
**संपर्क : भ्र. ७७७६९०२२६७**
**इमेल** : pwatsaru@yahoo.com
**संकेतस्थळ** : www.pvatsaru.com